भारतीय रिझर्व बँक
---------------------- रिझर्व बँक ऑफ इंडिया-----------------------
www.rbi.org.in

**आरबीआय/२०१३-१४/७४**
**डीबीओडी.क्र.डीआयआर.बीसी ११/१३.०३.००/२०१३-१४** **जुलै १, २०१३**
**आषाढ १०, १९३५** (शक)

**सर्व शेड्युल कमर्शियल बँका**
**(आरआरबीज् सोडून)**

महोदय/महोदया,

**एफसीएनआर(बी) खात्यात ठेवलेल्या ठेवींबाबतच्या सूचनांचे महापरिपत्रक**

कृपया आमचे महापरिपत्रक डीबीओडी क्र.डीआयआर.बीसी ८/१३.०३.००/२०१२-१३ दि. जुलै २, २०१२ चा संदर्भ घ्यावा. त्यात आम्ही, जून ३०, २०१२ पर्यंत एफसीएनआर(बी) खात्यांमध्ये ठेवण्यात आलेल्या ठेवीं संबंधीची मार्गदर्शक तत्वे/निदेश एकत्रित केली आहेत. हे महापरिपत्रक, जून ३०, २०१३ पर्यंत दिलेल्या सूचना त्यात समाविष्ट करुन अद्यावत करण्यात आले असून ते आरबीआयच्या वेबसाईटवरही (http://www.rbi.org.in) टाकण्यात आले आहे. ह्या महापरिपत्रकाची एक प्रत सोबत जोडण्यात आली आहे.

आपला

**(प्रकाश चंद्र साहु)**
**मुख्य महाव्यवस्थापक**
सहः वरील प्रमाणे

बँक आर्थिक व्यवहार विभाग आणि विकास विभाग, केंद्रीय कार्यालय, १३ वा मजला, सीओबी, शहीद भगतसिंह मार्ग,
फोर्ट, मुंबई-४००००१
फॅक्स क्र. ९१-२२-२२७०१२४१ टेलिफोन.:९१-२२-२२६०१०००, ईमेल आयडीः cgmicdbodco@rbi.org.in

## अनुक्रमणिका


| परिच्छेद क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| अ | उद्दिष्ट | ३ |
| ब | वर्गीकरण | ३ |
| क | मागील सूचना | ३ |
| ड | लागु होणे/उपयोग | ३ |
| १. | प्रस्तावना | ५ |
| २. | मार्गदर्शक तत्वे | ६ |
| २.१ | ‘ठेव’ ह्या संज्ञेची व्याख्या | ६ |
| २.२ | ह्या योजनेची महत्वाची अन्य लक्षणे | ६ |
| २.३ | ठेवींवर अतिरिक्त व्याज देण्याबाबत | ७ |
| २.४ | बँकेच्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या ठेवींवर एक टक्क्यापेक्षा अधिक नसलेल्या दराने व्याज देण्याचे मत देण्याबाबत | ७ |
| २.५ | ठेवींची मुदतपूर्व निकासी | ७ |
| २.६ | मुदतबाह्य एफसीएनआर (बी) ठेवींवर व्याजप्रदान | ८ |
| २.७ | एफसीएनआर (बी) ठेवीविरुध्द अग्रिम राशी - व्याज़ आकारण्याची रीत | ८ |
| २.८ | एफसीएनआर (बी) ठेवींविरुध्द दिलेल्या अग्रिमराशींवरील निर्बंध - कर्जांचे आकारमान | ८ |
| २.९ | मृत ठेवीदाराच्या ठेवीवर द्यावयाचे व्याज | ८ |
| २.१० | संयुक्त खातेदारांची नावे वाढविणे किंवा कमी करणे | ९ |
| २.११ | भारतात परतल्यावर एनआरआयना, एफसीएनआर (बी) ठेवींवरील व्याजाचे प्रदान | ९ |
| २.१२ | परतणाऱ्या भारतीयांच्या एफसीएनआर (बी) खात्यांचे आरएफसी खात्यात रुपांतरण - दंड रद्द करणे. | ९ |
| २.१३ | परतणाऱ्या भारतीयांच्या एफसीएनआर (बी) खात्यांचे आरएफ खात्यांमध्ये रुपांतरण दंड रद्द करणे. | १० |
| २.१४ | शनिवार/रविवार/सुट्टी/व्यवहार नसल्याचा कामकाजाचा दिवस ह्या दिवशी परिपक्व होणाऱ्या मुदत ठेवीवर व्याज-प्रदान | १० |
| २.१५ | मनाई | १० |
| जोडपत्र १ | विदेशी मुद्रा अनिवासी खाती (बँका) योजनेखाली स्वीकारलेल्या ठेवींना लागु असलेले व्याजदर | ११ |
| परिशिष्ट | एकत्रित केलेल्या परिपत्रकाची यादी | १२ |

## एफसीएनआर (बी) ठेवींवरील व्याजदरांबाबतचे महापरिपत्रक ठेवी उद्दिष्ट

**अ. उद्देश**

भारतीय रिझर्व बँकेने, एफसीएनआर (बी) ठेवींवरील व्याजदरांबाबत वेळोवेळी दिलेले निदेश ह्या महापरिपत्रकात एकत्रित करण्यात आले आहेत.

**ब. वर्गीकरण**

बँकिंग विनियम अधिनियम, १९४९ द्वारा दिलेल्या अधिकारांचा वापर करुन रिझर्व बँकेने दिलेले वैधानिक मार्गदर्शक तत्व.

**क. मागील सूचना**

जुलै १, २०१० परिशिष्टामध्ये, वरील विषयावर दिलेल्या महापरिपत्रकातील मागील सूचना ह्या **परिपत्रकात** अद्ययावत करण्यात आल्या आहेत.

**ड. लागु होणे/उपयोग**

प्रादेशिक ग्रामीण बँका सोडून सर्व अनुसूचित वाणिज्य बँकांसाठी

**रचना**


**१. प्रस्तावना**

**२. मार्गदर्शक तत्वे**

- २.१ 'ठेव' ह्या संज्ञेची व्याख्या
- २.२ ह्या योजनेची महत्वाची अन्य लक्षणे
- २.३ व्याजप्रदान करण्याची रीत
- २.४ बँकेच्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या ठेवींवर अधिक दराने व्याज देण्याचे मत देण्याबाबत
- २.५ ठेवींची मुदतपूर्व निकासी
- २.६ मुदतबाह्य एफसीएनआर (बी) ठेवींवर व्याजप्रदान
- २.७ एफसीएनआर (बी) ठेवीविरुध्द अग्रिम राशी - व्याज आकारण्याची रीत
- २.८ एफसीएनआर (बी) ठेवींविरुध्द दिलेल्या अग्रिमराशींवरील निर्बंध - कर्जांचे आकारमान
- २.९ मृत ठेवीदाराच्या ठेवीवर द्यावयाचे व्याज
- २.१० संयुक्त खातेदारांची नावे वाढविणे किंवा कमी करणे
- २.११ भारतात परतल्यावर एनआरआयना, एफसीएनआर (बी) ठेवींवरील व्याजाचे प्रदान
- २.१२ परतणाऱ्या भारतीयांच्या एफसीएनआर (बी) खात्यांचे आरएफसी खात्यात रुपांतरण - दंड रद्द करणे.
- २.१३ परतणाऱ्या भारतीयांच्या एफसीएनआर (बी) खात्यांचे आरएफसी खाती/निवासी रुपये खात्यांमध्ये रुपांतरण - व्याजाचे प्रदान
- २.१४ शनिवार/रविवार/सुट्टी/व्यवहार नसल्याचा कामकाजाचा दिवस ह्या दिवशी परिपक्व होणाऱ्या मुदत ठेवीवर व्याज-प्रदान
- २.१५ मनाई

**जोडपत्र** विदेशी मुद्रा अनिवासी खाती (बँका) योजनेखाली स्वीकारलेल्या ठेवींना लागु असलेले व्याजदर
**परिशिष्ट** एकत्रित केलेल्या परिपत्रकाची यादी

## १. <u>प्रस्तावना</u>

१.१ विदेशी मुद्रा अनिवासी (एफसीएनआर (बी)) योजना, १९७५ मध्ये सुरु केलेल्या त्यावेळच्या एफसीएनआर (ए) योजनेच्या ऐवजी, मे १५, १९९३ रोजी सुरु करण्यात आली. व त्यात विदेशी मुद्रेबाबतची जोखीम आरबीआय व म्हणजेच भारत सरकारवर पडत होती ही एफसीएनआर (ए) योजना, केंद्रीय बँकेच्या ताळेबंदासाठीचा गर्भितार्थ व सरकारला येणार अर्ध-वित्तीय खर्च ह्यामुळे ऑगस्ट, १९९४ ला काढून टाकण्यात आली होती. ऑक्टोबर १९९९ पासून, किमान परिपक्वता काल ६ महिन्यांवरुन १ वर्ष एवढा वाढविण्यात आला. जुलै २६, २००५ पासून, पूर्वीच्या कमाल ३ वर्षांच्या ऐवजी, कमाल ५ वर्षांच्या परिपक्वता काळासाठी एफसीएचआर (बी) ठेवी स्वीकारण्याची परवानगी बँकांना देण्यात आली.

१.२ सुरुवातीला, ही एफसीएनआर (बी) योजना चार प्रकारच्या चलनांमधेय स्वीकारलेल्या ठेवींना (उदा. पाउंड स्टर्लिंग, युएस डॉलर, डॉयश मार्क, व जापानीस येन) लागु होती. नोव्हेंबर ४, २००० रोजी, ही एफसीएनआर (ब) योजना युरोपामधील ठेवींनाही लागु करण्यात आली, तर डॉयश मार्क्समधील ठेवी ३१, डिसेंबर २००१ पर्यंतच स्वीकारल्या जात होत्या. ह्या तारखेनंतर परिपक्व झालेल्या डॉयस मार्कमधील ठेवींची रक्कम फक्त युरोंमध्येच **दे**य होती. जानेवारी १, २००२ पासून, एफसीएनआर(बी) ठेवींमधील स्वीकार्य असलेली चलने म्हणजे, पाउंड स्टर्लिंग, युएस डॉलर्स, जापानी येन आणि युरो, जुलै २६, २००५ रोजी, ह्या चार चलनां व्यतिरिक्त, (म्हणजे, पाउंड स्टर्लिंग, युएस डॉलर्स, जपानी येन व युरो) ही योजना, कॅनडियन डॉलर्स, ऑस्ट्रेलियन डॉलर्समधील एफसीएनआर (बी) ठेवींनाही करण्यात आली. फेमा १९९९ खाली व्यक्तींसाठी असलेल्या सुविधांचे पुनरावलोकन करण्यासाठी असलेल्या समितीच्या शिफारशींवर आधारित, विदेशी मुद्रा विभागाने (एफ ई डी), ऑक्टोबर १९, २०११ पासून, परवानगीप्राप्त अशा कोणत्याही चलनामध्ये एफसीएनआर(ब) ठेवी स्वीकारण्यासाठी बँकांना परवानगी देण्यात आली आहे. ह्या संबंधाने परवानगीप्राप्त चलन चा अर्थ, वेळोवेळी सुधारित केलेल्या <u>फेमा १४/२००० आरबी दि. मे ३, २०००</u> च्या विनियम २(v) मध्ये व्याख्या केल्यानुसार, मुक्तपणे परिवर्तनीय असलेले विदेशी चलन/मुद्रा असा असेल.

१.३ ह्यापूर्वी, एफसीएचआर (बी) ठेवीसाठी असलेले व्याजदर, एफसीएचआर (ए) ठेवींसाठी असलेल्या व्याजदरा एवढेच होते. १६ एप्रिल १९९७ पासून, विहित मर्यादांच्या आत असलेले व्याजदर ठरविण्याचे (स्थिर किंवा तरल व व्याज पुनर्धारण काल ६ महिने) स्वातंत्र्य बँकांना देण्यात आले. सर्व प्रकारच्या परिपक्वता असलेल्या एफसीएचआर (बी) ठेवींसाठीच्या कमाल व्याजदर, मे ४, २०१२ रोजी भारतातील व्यवहार बंद झाल्यापासून, लिबॉर/स्वॅप दर २००/३०० बेसिस पॉईंट्स एवढा आहे.

१.४ पूर्वी, जानेवारी २००६ पर्यंत, मागील महिन्याच्या शेवटच्या कामकाजाच्या दिवशी असलेला लिबॉर/स्वॅप दर, एनआरई/एफसीएचआर (बी) ठेवीं वरील, पुढील महिन्यापासून देय असलेल्या व्याजासाठी असलेल्या दराची मर्यादा ठरविण्यासाठी पाया ठरविण्यात आला होता. एनआरई/एफसीएचआर (बी) ठेवींवरील व्याजदरांमध्ये एकसमानता व पारदर्शकता आणण्याचे लिबॉर/स्वॅप दर, फेडाई देईल/प्रदर्शित करील. आता, प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या कामकाजाच्या दिवशी, सहा चलनांमधील पाच परिपक्वतांसाठी असलेले ठेवी-दर, फेडाई प्रदर्शित करते व हे रॉयटर्सच्या स्क्रीनवरील वेबपेज पाहून सर्वजण मिळवू शकतात. असे सर्वप्रथम दर फेडाईने फेब्रुवारी २००६ च्या शेवटच्या कामाच्या दिवशी प्रदर्शित केले होते.

१.५ विदेशी मुद्रेमध्ये प्राधिकृत डीलर असलेल्या वाणिज्य बँकेने, मे १५, १९९३ रोजी जारी झालेल्या, विदेशी मुद्रा (अनिवासी) खाते (बँका) योजनेखाली तिने स्वीकारलेल्या किंवा नूतनीकृत केलेल्या पैशांच्या ठेवींवर, ह्यामधील **जोडपत्र १** मध्ये विहित केलेले दर सोडल्यास अन्य दराने आणि खाली दिलेल्या मार्गदर्शक तत्वात विहित केलेल्या अटी शर्तींशिवाय व्याज देऊ नये.

## २. मार्गदर्शक तत्वे

### २.१ 'ठेव' ह्या संज्ञेची व्याख्या

ह्या योजनेखालील ठेवी म्हणजे, एका ठरविलेल्या कालावधीसाठी आणि त्या कालावधीच्या अखेरीनंतर निकासक्षम असलेल्या 'मुदत ठेवी' आणि त्यात पुनर्गुंतवणुक ठेवी आणि रोख प्रमाणपत्रे किंवा त्या स्वरुपाच्या ठेवींचा समावेश होतो.

### २.२ ह्या योजनेची महत्वाची अन्य लक्षणे

(i) ह्या योजनेमध्ये, भारतीय राष्ट्रीयत्वाच्या किंवा वंशाच्या अनिवासी व्यक्तींनी ठेवलेल्या ठेवी येतात.

सूचना/टीप :

अ) विदेशी कंपन्या, संस्था, सोसायट्या ह्यासारख्या विदेशी कॉर्पोरेट संस्था आणि प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे एनआरआयच्या ६०% मालकीच्या आहेत आणि अशा व्यक्तींची (ओबीसी) अपरिहार्यपणे ६०% हितसंबंध आहे असे विदेशी ट्रस्ट ह्यांच्याद्वारे एफसीएनआर (बी) खाती उघडण्याची व चालविण्याची सुविधा सप्टेंबर १६, २००३ पासून काढून घेण्यात आली आहे.

ब) एखाद्या ओसीबीच्या नावे ठेवलेले विद्यमान एफसीएनआर (बी) खाते, मूळच्या परिपक्वतेपर्यंत सुरु ठेवण्यास हरकत नसावी. आणि ते परिपक्व झाल्यावर त्यातील रक्कम ताबडतोब प्रत्यावर्तित केली जावी.

(ii) विदेशी मुद्रामधील निधीचे प्रत्यावर्तन करण्यास परवानगी आहे.

(iii) ह्या योजनेखाली पुढील परिपक्वताकालासाठी ठेवी स्वीकारला जाव्यातः

(अ) एक वर्ष व त्यापेक्षा जास्त परंतु दोन वर्षांपेक्षा कमी
(ब) दोन वर्ष व त्यापेक्षा जास्त परंतु तीन वर्षांपेक्षा कमी
(क) तीन वर्ष व त्यापेक्षा जास्त परंतु चार वर्षांपेक्षा कमी
(ड) चार वर्ष व त्यापेक्षा जास्त परंतु पाच वर्षांपेक्षा कमी
(ई) फक्त पाच वर्षे

सूचना/टीप : एफसीएनआर (ब) योजनेखाली आवर्ती ठेवी स्वीकारु नयेत.

(iv) त्याच एका खातेदाराच्या विद्यमान एनआरई खात्यातून एफसीएनआर (बी) खात्यात व त्या उलट हस्तांतरण करणे रिझर्व बँकेच्या पूर्वमंजुरी शिवायही करण्यास परवानगी आहे.

(v) निरनिराळ्या परिपक्वता असलेल्या ठेवींवर, बँक देऊ करत असलेल्या रिझर्व बँकेने विहित केलेल्या मर्यादेच्या आतील व्याजदरांसाठी, त्या बँकेने तिच्या संचालक मंडळाची मंजुरी घ्यावी. बँकेचे संचालक मंडळ, ॲसेट लायाबिलिटी मॅनेजमेंट समितीला ठेवींवरील व्याजदर ठरविण्यात प्राधिकृत करु शकते. मात्र, त्यानंतर त्याबाबत संचालक मंडळाला लगेच कळविले जावे.

### २.३ व्याजप्रदान करण्याची रीत

i) ह्या योजनेखाली स्वीकारलेल्या ठेवींवर वर्षाचे ३६० दिवस धरुन व्याज दिले जावे.

ii) एफसीएनआर (बी) ठेवींवरील याज प्रत्येकी १८० दिवसांचे मध्यंतर धरुन काढले जावे व त्यानंतर उरलेल्या प्रत्यक्ष दिवसांवर दिले जावे. तथापि, ती ठेव परिपक्व झाल्यावर चक्रवाढीने व्याज मिळविण्याच्या पर्याय ठेवीदाराला आहे.

## २.४ **बँकेच्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या ठेवींवर एक टक्क्यापेक्षा अधिक नसलेल्या दराने व्याज देण्याचे मत देण्याबाबत**

पूर्वीच्या सूचनांनुसार, कर्मचा-यांच्या (विद्यमान किंवा सेवानिवृत्त) एफसीएनआर (बी) ठेवींबाबत, ते कर्मचारी असल्यामुळे, त्यांना दिलेल्या अतिरिक्त व्याजासह दिला जाणारा व्याजदर हा, आरबीआयने वेळोवेळी विहित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक असू नये.

पुनरावलोकनानंतर, असे ठरविण्यात आले की, जुलै १८, २०१२ पासून, अनिवासी व्यक्तींच्या कोणत्याही प्रकारच्या ठेवींवर अतिरिक्त व्याजदर दिला जाऊ नये. त्यानुसार, एफसीएनआर (बी) खात्यांखालील, बँकेच्या स्वतःच्या कर्मचा-यांच्या ठेवींवर एक टक्का अधिक व्याजदर देण्याबाबत बँकांना असलेले स्वमत काढून टाकण्यात आले आहे.

## २.५ **ठेवीची मुदतपूर्व निकासी**

(i) एफसीएनआर (बी) योजनेखाली, ठेवीदाराने तशी विनंती केल्यास बँकांनी ठेवींची मुदतपूर्व निकासी करण्याची परवानगी द्यावी. अशा मुदतीपूर्व निकासींसाठी दंड ठरविण्यास बँकांना स्वातंत्र्य आहे. एफसीएनआर (बी) ठेवीच्या मुदतपूर्व निकासींच्या बाबतीत स्वॅप खर्च वसूल करण्यास बँका दंड आकारु शकतात. किमान एक वर्षाचा वैधानिक काल पूर्ण होण्यापूर्वीच जेथे एफसीएनआर (बी) ठेवी काढल्या जातात. व्याज कोणतेही व्याज दिले जात नाही, तेथे स्वॅपचा खर्च वसूल करण्यासाठी बँका दंड आकारु शकतात तथापि, (जेथे कोणतेही व्याज दिले जात नाही)ठेवी स्वीकारतेवेळी, अशा दंडाबाबत ठेवीदारांना स्पष्ट जाणीव करुन दिली जावी. ठेवी स्वीकारतेवेळी दंडाबाबतची स्पष्ट जाणीव ठेवीदारांना न करुन दिल्यास, मुदतपूर्व निकासीमुळे झालेली विनिमय हानि बँकांनाच सोसावी लागेल.

(ii) परिपक्वतेपूर्वी एफसीएनआर (बी) ठेवींचे एनआरई ठेवीत व त्याउलट रुपांतरण ह्यासाठी मुदतपूर्व निकासीसंबंधीच्या वैधानिक तरतुदी लागु असतील.

## २.६ **मुदतबाह्य एफसीएनआर (बी) ठेवींवर व्याजप्रदान**

परिपक्वतेच्या तारखेपासून नूतनीकरणाच्या तारखेपर्यंतचा (दोन्हीही दिवस समाविष्ट) काल १४ दिवसांपेक्षा अधिक नसल्यास बँका, त्यांना तसे वाटल्यास एखाद्या मुदतबाह्य ठेवीचे किंवा तिच्या भागाचे नूतनीकरण करु शकतात. अशा नूतनीकरण केलेल्या ठेवीच्या रकमेवर देय असलेला व्याजदर हा, परिपक्वतेच्या तारखेस लागु असलेला नूतनीकरणाच्या कालावधीसाठी योग्य असा, किंवा ठेवीदार नूतनीकरण करेल त्या तारखेस लागु असलेला (ह्यापैकी कमी असेल तो) व्याजदर असावा. मुदतबाह्य ठेवींच्या बाबतीत, मुदतीबाह्य काल १४ दिवसांच्या वर गेला असल्यास आणि अशा मुदतबाह्य ठेवीची संपूर्ण रक्कम किंवा एक भाग ठेवीदार एक नवीन एफसीएनआर (बी) ठेव म्हणुन ठेवत असल्यास, अशी नवीन मुदतीची ठेव म्हणून ठेवलेल्या रकमेवर, मुदतबाह्य कालावधीसाठी बँका त्यांचे स्वतःचे व्याजदर ठरवू शकतात. नूतनीकरण केल्यावर किमान वैधानिक काल पूर्ण होण्यापूर्वीच ती ठेव काढून घेण्यात आल्यास त्यावर दिले गेलेले व्याज परत मिळविण्याचे स्वातंत्र्य बँकांना आहे.

## २.७ **एफसीएनआर (बी) ठेवीविरुध्द अग्रिम राशी - व्याज आकारण्याची रीत**

(i) एखाद्या कर्जदाराच्या नावे एकमेव किंवा संयुक्तपणे असलेल्या एफसीएनआर (बी) ठेवीविरुध्द एखादे कर्ज किंवा अग्रिम राशी दिल्या गेल्यास, बँकेच्या स्वतःच्या बेसरेटचा संदर्भ न घेताही व्याजदर आकारण्याचे स्वातंत्र्य बँकांना आहे.

(ii) ज्याच्या विरुध्द मुदत ज्याच्याविरुध्द अग्रिम राशी दिली गेली आहे अशी मुदत ठेव, विहित केलेल्या किमान वैधानिक काल पूर्ण होण्यापूर्वीच काढून घेतली गेल्यास अशी अग्रिम राशीला मुदत कर्जाविरुध्द दिलेली अग्रिमराशी असे समजले जाऊ नये. आणि त्यावरील व्याज, रिझर्व बँकेने अग्रिम राशींवरील व्याजदरासंबंधी दिलेल्या निदेशाच्या विहित अटीनुसार आकारले जावे.

(iii) ह्या योजनेखाली राबविल्या जाणाऱ्या स्त्रोतांमधून एखादे कर्ज किंवा अग्रिम राशी दिली गेल्यास आकारावयाचा व्याजदर रिझर्व बँकेने अग्रिम राशींवरील व्याजदरासंबंधी दिलेल्या निदेशाच्या विहित अटीनुसार आकारले जावे..

२.८. **एफसीएनआर (बी) ठेवींविरुध्द दिलेल्या अग्रिमराशींवरील निर्बंध – कर्जांचे आकारमान**

२८ एप्रिल २००९ पासून, एन आर (ई) आर ए आणि एफसीएनआर (बी) खात्यात ठेवलेल्या निधींच्या प्रतिभूतींविरुध्द, त्या ठेवीदारांना किंवा तृतीय पक्षांना, रु.५.०० लाखांपर्यंतची कर्जे देण्यात बँकांना परवानगी दिली गेली होती.

ह्या बाबतच्या विद्यमान स्थितीचे पुनरावलोकन केल्यावर असे ठरविण्यात आले की ऑक्टोबर १२, २०१२ पासून, एन आर (ई) आर ए व एफसीएनआर (बी) खात्यांमधील ठेवीं विरुध्द, त्या ठेवीदारांना किंवा तृतीय पक्षांना, बँका पुढीलप्रमाणे कर्ज देऊ शकतात.

| | विद्यमान तरतुद | सुधारित तरतुद |
|---|---|---|
| भारतामधील रुपयांच्या स्वरुपातील कर्जे * | | |
| एनआई/एफसीएनआर (बी) मधील स्थिर ठेवींविरुध्द कर्जे | रु.१०० लाखांची मर्यादा लागु | नेहमीच्या मार्जिन आवश्यकतांचे पालन केले असल्यास कोणत्याही मर्यादेशिवाय ठेवीदार/तृतीय पक्षांना रुपयातील कर्जे देण्यास परवानगी आहे. ** |
| भारतामध्ये/भारताबाहेरील विदेशी मुद्रेमधील कर्जे* | | |
| एनआरई/एफसीएनआर (बी) च्या स्थिर ठेवींविरुध्द दिलेली कर्जे | रु. १०० लाखांची मर्यादा लागु नेहमीच्या मार्जिन | आवश्यकतांचे पालन केले असल्यास, ठेवीदार/तृतीय पक्षाला, कोणत्याही मर्यादेशिवाय विदेशी मुद्रा कर्जे देण्यास परवानगी आहे. ** |

*कर्ज ह्या संज्ञेत निधी आधारित असलेल्या/निधी आधारित नसलेल्या सर्व प्रकारच्या सुविधांचा समावेश आहे.

** एफसीएनआर (बी) ठेवींच्या बाबतीत, मार्जिनची आवश्यकता ही, विदेशी मुद्रा व्यवस्थापन (ठेवी) विनियम, २००० च्या शेड्युल २ मधील परिच्छेद ९(२) अनुसार काढली जाईल.

ह्याशिवाय एनआरई/एफसीएनआर (बी) ठेवींची मुदतपूर्व निवासी करण्याची सुविधा, अशा ठेवींविरुध्द कर्जे घेतली असल्यास उपलब्ध होणार नाही. असे कर्ज घेतेवेळी, ही आवश्यकता, ठेवीदाराच्या नजरेस आणावी. वरील सूचनेनुसार नसलेली विद्यमान कर्जे, त्यांच्या विद्यमान मुदतीपर्यंत सुरुच राहतील व त्यांचे नूतनीकरण/रोल ओव्हर केले जाणार नाही. एनआरई/एफसीएनआर (बी) ठेवींविरुध्द कर्ज देण्याबाबतच्या इतर अटींमध्ये कोणताही बदल नाही.

२.९ **मृत ठेवीदाराच्या ठेवीवर द्यावयाचे व्याज**

पुढील व्यक्तींच्या नावे असलेल्या मुदत ठेवीच्या बाबतीत -

i) मृत झालेला ठेवीदार (वैय्यक्तिक), किंवा

ii) दोन किंवा अधिक संयुक्त ठेवीदार जेथे त्यापैकी एकाचा मृत्यु झाला आहे खाली दिलेल्या रितीने व्याज दिले जावेः

(अ) त्या ठेवीच्या परिपक्वतेनंतर करारानुसार असलेल्या दराने;

(ब) परिपक्वतेच्या तारखेपूर्वीच त्या ठेवीचे प्रदान मागितल्यास, ती ठेव ठेवण्याच्या तारखेस लागु असलेल्या दराने व कोणताही दंड न आकारता बँकांनी व्याज द्यावे;

(क) त्या ठेवीच्या परिपक्वतेच्या तारखेपूर्वीच ठेवीदार मरण पावल्यास परिपक्वता तारखेनंतर त्या ठेवीवर हक्क सांगितला गेल्यास, बँकांनी, करारानुसार असलेल्या दराने, परिपक्वतेपर्यंतचे व्याज द्यावे तथापि, त्या ठेवीच्या परिपक्वतेनंतर ठेवीदाराचा मृत्यु झाल्यास, बँकांनी, आरएफसी खाते योजनेखालील बचत खात्यावर त्या परिपक्वता तारखे दिवशी लागु असलेल्या व्याजदराने, परिपक्वता तारीख ते प्रदान तारखेपर्यंतचे व्याज द्यावे.

(ड) हक्कदारांनी विनंती केल्यास, बँक जर मुदत ठेवीच्या रकमेचे भाग करुन दोन किंवा अधिक पावत्या त्या हक्कदारांच्या वैय्यक्तिक नावाने देण्यास तयार असेल, तेव्हा ती बाब, दंड आकारण्यालायक अशी मुदतपूर्वी निकासी समजली जाऊ नये. मात्र त्या ठेवीची एकूण रक्कम व मुदत ह्यात बदल केलेला नसावा.

सूचना/टीपः असे हक्कदार निवासी असल्यास, परिपक्वतेनंतर मिळालेल्या रकमेचे, परिपक्वतेच्या तारखेस भारतीय रुपयांमध्ये रुपांतर करता येऊ शकते आणि त्यानंतरच्या कालासाठी त्यावरील व्याज, देशांतर्गत ठेव योजनेखाली, त्याच परिपक्वताकालासाठी लागु असलेल्या दराने दिले जावे.

## २.१० संयुक्त खातेदारांची नावे वाढविणे किंवा कमी करणे

सर्व संयुक्त खातेदारांची तशी विनंती केल्यास, बँक तशीच परिस्थिती असल्यास, संयुक्त खातेदारांच्या नावात वाढ किंवा कपात करु शकते किंवा एखाद्या एकमेव खातेदाराला, दुसऱ्या एखाद्या व्यक्तीचे नाव, संयुक्त खातेदार म्हणून घालण्यास परवानगी देऊ शकते. तथापि, मूळ ठेवीची रक्कम किंवा ह्यात कोणत्याही प्रकारे बदल केला जाऊ नये असे करण्यासाठी असलेली कारणे बँकेने अर्जदारांकडून समजावून घ्यावीत आणि ती विनंती खरी असल्याची खात्री करुन घ्यावी. ह्याशिवाय, एखाद्या निवासी व्यक्तीबरोबर एफसीएनआर (बी) खाते उघडण्यासाठी, तसेच, भारतीय वंशाचे असले तरीही पाकिस्तानी/बांगला देशीय राष्ट्रीयत्वांच्या व्यक्तींच्या नावे खाती उघडण्यासाठी एफईडी, आरबीआय ह्यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचना लागु होतील.

## २.११ भारतात परतल्यावर एनआरआयना, एफसीएनआर (बी) ठेवींवरील व्याजाचे प्रदान

भारतीय राष्ट्रीयत्व/वंशाच्या, भारतात कायमचे वास्तव्य करण्यासाठी परतणाऱ्या व्यक्तींच्या, एफसीएनआर (बी) ठेवी त्यांच्या परिपक्वतेपर्यंत ठरविलेल्या व्याजदराने सुरु ठेवण्यास बँकेला परवानगी आहे. एफसीएनआर(बी) ठेवींना लागु असलेला व्याजदर व राखीव निधीची आवश्यकता सोडल्यास, इतर सर्व हेतूंसाठी, तो खातेदार भारतात परतल्याच्या तारखेपासून अशा ठेवींना निवासी ठेवी समजले जावे. अशा एफसीएनआर (बी) खात्यांची मुदतपूर्व निकासी, ह्या योजनेच्या वैधानिक तरतुदींनुसार केली जावी. खातेदाराच्या मर्जीनुसार, बँकांनी, एफसीएनआर (बी) ठेवींचे परिपक्वतेनंतर रुपांतर, निवासी रुपये ठेव खाते किंवा आरएफसी खात्यामध्ये (पात्र असल्यास) करावे. अशा नव्या ठेवीवरील (रुपये खाते किंवा आरएफसी खाते) व्याजदर अशा ठेव खात्यासाठी संबंधित असा असावा.

## २.१२ परतणाऱ्या भारतीयांच्या एफसीएनआर (बी) खात्यांचे आरएफसी खात्यात रुपांतरण - दंड रद्द करणे.

अनिवासी भारतीयांना, ते भारतात परतल्यावर, त्यांच्या एफसीएनआर(बी) खात्यामधील शिल्लकेचे मुदतपूर्ण रुपांतरण केल्यास त्यावर दंडात्मक तरतुदी लागु होणार नाहीत.

## २.१३ परतणाऱ्या भारतीयांच्या एफसीएनआर (बी) खात्यांचे आरएफसी खाती/निवासी रुपये खात्यांमध्ये रुपांतरण - व्याजाचे प्रदान

एफसीएनआर (बी) खात्यांचे,(ते खाते किमान परिपक्वताकालासाठी सुरु नसले तरीही) आरएफसी/निवासी रुपये

खात्यामध्ये रुपांतरण करताना बँकेने, तिच्या मतानुसार त्यावर व्याज द्यावे. मात्र, तो व्याजदर, आरएफसी खाते योजनेखाली असलेल्या बचत ठेव खात्यावर दिल्या जाणाऱ्या दरापेक्षा अधिक नसावा.

## २.१४ <u>शनिवार/रविवार/सुट्टी/व्यवहार नसल्याचा कामकाजाचा दिवस ह्या दिवशी परिपक्व होणाऱ्या मुदत ठेवीवर व्याज-प्रदान</u>

पुनर्गुंतवणुक ठेवींच्या बाबतीत बँकांनी, आलेल्या शनिवार/रविवार/सुट्टीचा/व्यवहार नसण्याचा कामकाजाचा दिवस ह्यासाठीही परिपक्वता मूल्यावर व्याज द्यावे. तथापि, सर्वसाधारण मुदत ठेवींसाठी, आलेल्या शनिवार/रविवार/सुट्टी/काम नसण्याचा कामाचा दिवस ह्यासाठी मूळ मुद्दल रकमेवर व्याज द्यावे.

## २.१५ <u>मनाई</u>

कोणत्याही बँकेने :

(i) पाच वर्षापेक्षा अधिक काळासाठी ठेव स्वीकारु किंवा नूतनीकृत करु नये.

(ii) साईझ ग्रुप धर्तीवर सोडल्यास, त्याच दिवशी, त्याच परिपक्वतेसाठी, स्वीकारलेल्या एका व दुसऱ्या ठेवीवर द्यावयाच्या व्याजदराबाबत भेदभाव करु नये. मग त्या ठेवी त्याच कार्यालयात किंवा बँकेच्या निरनिराळ्या कार्यालयात स्वीकारलेल्या असोत. ठेवींच्या आकारावर आधारित निरनिराळे व्याजदर देण्याच्या परवानगीसाठी पुढील अटी लागु आहेतः

अ) बँकांनी त्यांच्या मतानुसार, निरनिराळे व्याजदर देण्याबाबत, चलन-निहाय किमान आकारमान ठरवावे. तीच परिपक्वता असलेल्या विहित आकारमानाखाली असलेल्या मुदत ठेवींसाठी तोच व्याजदर असावा.
ब) असे निरनिराळे दर दिले जाणे विहित केलेल्या मर्यादेत असावेत.
क) बँकांनी दिलेले व्याजदर शेड्युलनुसार असावेत व ठेवीदार आणि बँक ह्या दरम्यानच्या वाटाघाटींनुसार नसावेत.

(iii) एफसीएनआर (बी) मोहिमेखाली सुरु केलेल्या योजनेमधील ठेवींवर कोणतीही व्यक्ती, संस्था, कंपनी, संघ, संस्था ह्यांना किंवा अन्य व्यक्ती ह्यांना कोणत्याही प्रकारची दलाली, कमिशन किंवा प्रलोभने देऊ नयेत.

(iv) ठेवी गोळा करण्यासाठी किंवा कोणत्याही प्रकारचा मोबदला अथवा शुल्क किंवा दलाली देऊन ठेव संबंधित उत्पाद विकण्यासाठी, एखादी व्यक्ती, संस्था, कंपनी, संघ, संस्था किंवा अन्य कोणतीही व्यक्ती नोकरीवर ठेवू नये.

(v) व्याजमुक्त ठेव स्वीकारु नये किंवा अप्रत्यक्षपणे भरपाई देऊ नये

**जोडपत्र १**

**विदेशी मुद्रा अनिवासी खाती (बँका) योजनेखाली स्वीकारलेल्या ठेवींना लागु असलेले व्याजदर**

**[परिच्छेद १.५]**

(अ) मे ४, २०१२ रोजी भारतातील व्यवहार बंद झाल्यापासून करार केलेल्या सर्व परिपक्वतांच्या एफसीएनआर(बी) ठेवींसाठी, व्याजदर खालील प्रमाणे दिले जातील

| परिपक्वता काल | व्याजदर (मर्यादा) |
|---|---|
| १ वर्ष ते ३ वर्षाहून कमी | लिबॉर/स्वॅप अधिक २०० बेसिस पॉईंट्स |
| ३ – ५ वर्षे | लिबॉर/स्वॅप अधिक ३०० बेसिस पॉईंट्स |

तरत्या दराच्या ठेवीसाठी, संबंधित चलन/परिपक्वतेसाठी असलेल्या स्वॅप दराच्या मर्यादेतील दराने व्याज २००/३०० बेसिस पॉईंट्स एवढे दिले जातील.

(ब) नोव्हेंबर २३, २०११ रोजी भारतातील व्यवहार बंद झाल्यापासून मे ४, २०१२ पर्यंत केल्या गेलेल्या, सर्व परिपक्वतांच्या एफसीएनआर(बी) ठेवींबाबत, संबंधित चलन/संबंधित परिपक्वतांसाठी, लिबॉर/स्वॅप दर अधिक १२५ बेसिस पॉईंट्स ह्यांच्या मर्यादेत असलेला व्याजदर दिला जाईल. तरत्या दराच्या ठेवींवर, संबंधित चलन/परिपक्वतेसाठी स्वॅप दराच्या मर्यादेत अधिक १२५ पॉईंट्स एवढा व्याजदर असेल.

(क) नोव्हेंबर १५, २००८ रोजी भारतातील व्यवहार बंद झाल्यापासून नोव्हेंबर २२, २०११ पर्यंत केल्या गेलेल्या, सर्व परिपक्वतांच्या एफसीएनआर(बी) ठेवींबाबत, संबंधित चलन/संबंधित परिपक्वतांसाठी, लिबॉर/स्वॅप दर अधिक १०० बेसिस पॉईंट्स ह्यांच्या मर्यादेत असलेला व्याजदर दिला जाईल. तरत्या दराच्या ठेवींवर, संबंधित चलन/परिपक्वतेसाठी स्वॅप दराच्या मर्यादेत अधिक १०० पॉईंट्स एवढा व्याजदर असेल.

(ड) तरत्या दराच्या ठेवींसाठी व्याजाचा रिसेट काळ सहा महिने एवढा असेल.

(ई) मागील महिन्याच्या शेवटच्या कामाच्या दिवशी असलेला लिबॉर/स्वॅप रेट हा, पुढील महिन्यात देऊ करावयाच्या व्याजदरांसाठी मर्यादा दर ठरविण्यासाठी आधारभूत धरला जाईल.

(फ) एफसीएनआर(बी) ठेवींवर देऊ करावयाचे व्याजदर काढण्यासाठी, बँकांनी एफईडीएआय द्वारा दिलेल्या/प्रदर्शित केलेल्या लिबॉर/स्वॅप दरांचा उपयोग करावा.

(ग) कार्यकृतीमधील सोयीसाठी व्याजदरांचे जवळच्या दोन दशांश स्थानांपर्यंत राऊंडिंग ऑफ करावे.

**परिशिष्ट**

## महापरिपत्रकात व्याज दरांच्या एफसीएनआर (बी) ठेवींची परिपत्रकात एकत्रित केलेली यादी

| विषय | | | |
|---|---|---|---|
| १. | डीबीओडी.क्र.डीआयआर.बीसी.४८आणि४९/१३.०३.००/२०००-०१ | ०४.११.२०००* | एफसीएनआर (बँक्स) खात्यांमध्ये ठेवलेल्या ठेवींवरील व्याजदर |
| २. | डीबीओडी.क्र.डीआयआर.बीसी.६३ आणि ६४/१३.०३.००/२०००-०१ | ०३.०१.२००१ | विदेशी मुद्रा (अनिवासी) खाती (बँक्स) योजना |
| ३. | डीबीओडी. क्र.डीआयआर. बीसी.१०५ आणि १०७/१३.०३.००/२०००-०१ | १९.०४.२००१ | विदेशी मुद्रा (अनिवासी) खाती (बँक्स) योजना |
| ४. | डीबीओडी.क्र.डीआयआर.बीसी.०९/१३.०३.०० /२००१-०२ | ११.०८.२००१ | एफसीएनआर(बी) खात्यात ठेवलेल्या ठेवी |
| ५. | डीबीओडी.क्र.डीआयआर.बीसी.९७ आणि ९८/१३.०३.००/२००१-०२ | २९.०४.२००२ | एफसीएनआर(बी) खात्यात ठेवलेल्या ठेवींवरील व्याजदर |
| ६. | डीबीओडी.क्र.डीआयआर.बीसी.३० आणि ३१ /१३.०३.००/२००२-०३ | ०८.१०.२००२ | एफसीएनआर(बी) ठेवींवरील व्याजदर |
| ७. | एपी (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. १४ | १६.९.२००३ | निवेशक वर्ग म्हणून विदेशी कॉर्पोरेट संस्थांना अमान्यता (डिरेकग्नीशन) |
| ८. | डीबीओडी.क्र.डीआयआर.बीसी.५१/१३.०३.०० /२००४-०५ | ०१.११. २००४ | २०००-०५ वर्षाच्या वार्षिक धोरण निवेदनांचे मध्यावधी पुनरावलोकन - विदेशी मुद्रा निवासी (बँक) खाती. |
| ९. | डीबीओडी.क्र.डीआयआर.बीसी.२२/१३.०३.०० /२००५-०६ | २६.०७.२००५ | एफसीएनआर(बी) ठेव योजना |
| १०. | डीबीओडी.क्र.डीआयआर.बीसी.६२/१३.०३.०० /२००५-०६ | ०८.०२.२००६ | अनिवासी ठेवींवरील व्याजदर |
| ११. | डीबीओडी.क्र.डीआयआर.बीसी.७५/१३.०३.०० /२००५-०६ | २९.०३.२००६ | एफसीएनआर(बी) ठेवींवरील व्याजदर |
| १२. | ए.पी.(डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.२९ | ३१.०१.२००७ | विदेशी मुद्रा व्यवस्थापन (ठेवी) विनियम, २००० - अनिवासी (बाह्य) रुपये खाती (एनआर(ई)आए)/विदेशी मुद्रा अनिवासी (बँक) (एफसीएनआर(बी) ठेवी ह्यांच्या प्रतिभूतीविरुध्द, अनिवासी/पक्षकार ह्यांना कर्जे देणे. |
| १३. | डीबीओडी.क्र.डीआयआर.बीसी.८८ आणि ८९ /१३.०३.००/२००६-०७ | २४.०४.२००७ | अनिवासी(बाह्य) रुपये (एनआरई) ठेवी व एफसीएनआर(बी) ठेवींवरील व्याजदर. |
| १४. | डीबीओडी.क्र.डीआयआर.बीसी.८२/१३.०३.०० /२००८-०९ | १५.११.२००८ | अनिवासी(बाह्य) रुपये (एनआरई) ठेवी व एफसीएनआर(बी) ठेवींवरील व्याजदर. |
| १५. | ए.पी.(डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.६६ | २८.०४.२००९ | विदेशी मुद्रा व्यवस्थापन (ठेवी) विनियम, २००० - अनिवासी (बाह्य) रुपये खाती (एनआर(ई)आए)/विदेशी मुद्रा अनिवासी (बँक) (एफसीएनआर(बी) ठेवी ह्यांच्या प्रतिभूतीविरुध्द, अनिवासी/पक्षकार ह्यांना कर्जे देणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| १६. | ए.पी.(डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.३६ | १९.१०.२०११ | कोणत्याही परिवर्तनीय चलनामध्ये, विदेशी मुद्रा (अनिवासी) खाते (बँक्स) योजना (एफसीएनआर(बी)) खाते उघडणे - उदारीकरण |
| १७. | डीबीओडी.क्र.डीआयआर.बीसी.५८ आणि ५९/१३.०३.००/२०११-१२ | २३.११.२०११ | अनिवासी(बाह्य) रुपये (एनआरई) ठेवी व एफसीएनआर(बी) ठेवींवरील व्याजदर. |
| १८. | डीबीओडी.क्र.डीआयआर.बीसी.१०१ आणि १०२/१३.०३.००/२०११-१२ | ०४.०५.२०१२ | एफसीएनआर(बी) ठेवींवरील व्याजदर |
| १९. | डीबीओडी.डीआयआर.बीसी.३०/१३.०३.००/२०१२-१३ | १८.०७.२०१२ | एफसीएनआर (बी) खात्यातील ठेवींवरील व्याजदर |
| २०. | ए.पी.(डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.४४ | १२.१०.२०१२ | एनआर (ई) आरए/एफसीएनआर (बी) मधील ठेवींच्या विरुध्द, अनिवासी/तृतीय पक्ष ह्यांना कर्जे देणे. |

* परिपत्रक दि. नोव्हेंबर ४, २००० हे ह्या विषयावरील सर्वसमावेशक निदेश असून त्यात आतापर्यंतच्या दुरुस्त्या समाविष्ट केल्या आहेत.